# कर्त्तव्यविचार

अथवा

# व्यवहारनीति

## भाग दुसरा.

हें पुस्तक

जगविख्यात रोमनवक्ता सिसरो याच्या 'डे आफिसि-
इस' नामक नीतिशास्त्र ग्रंथाच्या आधारानें
मराठींत तयार केलें;

तें

सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदून

मुंबईत

"सुबोधप्रकाश" छापखान्यांत छापिलें.

सन १८८३.

मुंबईमध्यें

हें पुस्तक विविधज्ञानविस्तारपुस्तकालयांत विकत मिळेल.

किंमत अडीच आणे.

[library stamp, illegible]

# कर्तव्यविचार.

अथवा

# व्यवहारनीति.

---

## भाग दुसरा.

नीतीच्या संबंधानें व हरएक प्रकारच्या सद्गुणाच्या संबंधानें आमचीं कर्तव्यकर्मे कोणतीं, याविषयीं पहिल्या भागांत बरेंच सविस्तर विवेचन केलें आहे. आतां प्रपंचामध्यें सुधारणा करतांना, व द्रव्य, मान, लौकिक इत्यादि साधन संपादन करतांना, कोणकोणतीं कर्तव्यें केलीं पाहिजेत, त्यांचा विचार या भागांत करूं. हा विचार करतांना, उपयोगी काय व उपयोगी नाहीं काय, हें सांगितलें पाहिजे. व अनेक उपयोगी गोष्टींतून अधिक उपयोगी गोष्ट कोणती, हेंही सांगितलें पाहिजे.

मनुष्याच्या जीवनाचें रक्षण करण्याकरितां ज्या वस्तु लागतात, त्यांतून कित्येक निर्जीव व कित्येक सजीव असतात. सोनें, रूपें, धान्य इत्यादि पदार्थ निर्जीव होत. सजीव पदार्थांना प्राणी असें ह्मणतात. प्राण्यांमध्यें कित्येकांना ज्ञान आहे, कित्येकांना नाहीं. ज्यांना ज्ञान नाहीं, असे प्राणी ह्मटले ह्मणजे, घोडे, बैल इत्यादि पशु, व मधमाशा ह्या होत. हे प्राणी आपल्या श्रमांच्या योगानें

मनुष्याच्या उपयोगीं पडतात. ज्यांना ज्ञान आहे असे प्राणी दोन प्रकारचे आहेत,—देव व मनुष्य. भक्ति व पुण्याचरण यांच्या योगानें देव प्रसन्न होतात, व मनुष्याचे साह्यकारी होतात. देवांच्या खालोखाल मनुष्यें मनुष्याच्या उपयोगीं पडतात. ( ज्या वस्तु अनिष्ट व घातुक आहेत, त्यांचेंही याप्रमाणेंच वर्गीकरण करायाचें. परंतु देव हे अनिष्ट व घातक आहेत असें ह्मणतां येत नाहीं; यासाठीं त्यांना वर्ज केलें, तर मनुष्यें हीं मनुष्याला नाशकारक आहेत असें होतें. ) मनुष्याच्या उद्योगाशिवाय कांहीं व्हावयाचें नाहीं. वर ज्या निर्जीव वस्तु सांगितल्या, त्या मनुष्याच्या श्रमांवांचून प्राप्त व्हावयाच्या नाहींत. व त्यांजवर मनुष्याच्या कौशल्याचा व मेहनतीचा प्रयोग झाल्यावांचून त्या मनुष्याच्या वापरांत यावयाच्या नाहींत. तसेंच, वैद्यक, नौकानयनशास्त्र, कृषिकर्म इत्यादि कला मनुष्याच्या श्रमांवांचून उत्पन्न झाल्या नसत्या. मनुष्यानें मनावर घेतलें नसतें तर व्यापाराची उत्पत्ति झाली नसती, व परदेशांतील जिन्नस आपल्या गांवांत व आपल्या गांवांतील परदेशांत नेतां आणतां आला नसता. मनुष्यानें परिश्रम केले नसते तर सोनें, रुपें, लोखंड इत्यादि धातु खाणींतून निघाल्या नसत्या, व दगड वगैरे फोडून कामीं लावण्यास मिळाले नसते. थंडी व उष्णता यांपासून आपलें संरक्षण होण्याकरितां जीं घरें आपण बांधितों, तीं मनुष्याच्या श्रमांवांचून झालीं नसतीं. किंवा वादळानें, भूमिकंपानें, अथवा काळानें त्यांचा नाश होतो तेव्हां मनुष्याच्या साह्यावांचून त्यांचा जीर्णोद्धार करतां आला नसता तसेंच मनुष्यांनीं मेहनत केली नसती, तर जलप्रवाहाचे मार्ग, कालवे,

पाट, लाटांना प्रतिबंध करण्यासाठीं धरणें, व कृतीनें केलेलीं बंदरें, हींही झालीं नसतीं.

वर सांगितलेल्या उदाहरणांवरून स्पष्ट दिसतें कीं, मनुष्याच्या श्रमांवांचून व साह्यावांचून आह्मांला निर्जीव पदार्थांचा उपयोग करून घेतां आला नसता, व मनुष्याच्या साह्यावांचून जनावरांचाही उपयोग झाला नसता. कोणतें जनावर कसल्या उपयोगीं पडतें, व कोणत्या जनावरापासून कसला फायदा होतो, हें प्रथम शोधून काढिलें तें मनुष्यानें. व अझून झालें तरी त्यांना चारा घालायाला, त्यांना माणसाळावयाला, त्यांची जतन करायाला, किंवा त्यांपासून हंगामीं होणारें उत्पन्न घेण्याला, मनुष्येंच पाहिजेत. त्याशिवाय हीं कामें होणार नाहींत. घातक जनावरांचा नाश करायाला व उपयोगीं जनावरें धरून पाळायाला कारण तरी मनुष्येंच. शिवाय या आयुष्यामध्यें जे क्लेश होतात ते सहन करतां यावे ह्मणून मनुष्याकडून ज्या नानाविध विद्यांची व कलांची योजना होते त्यांची गणती केली पाहिजे असें नाहीं. आमची सेवा करायाला त्या कला तयार नसत्या तर व्याधिग्रस्ताला आराम द्यायाला किंवा निरोगी मनुष्याला आनंद द्यायाला दुसरें काय होतें? व अन्नवस्त्र तरी कशापासून मिळालें असतें? परंतु ह्या कलांच्या योगानें मनुष्यांची स्थिति सुधरून त्यांच्या स्थितीमध्यें व पशूंच्या स्थितीमध्यें एवढें अंतर पडलें आहे. मनुष्यें एकवट होऊन त्यांनीं एकमेकांना मदत केली नसती तर शहरें उभीं झालीं नसतीं किंवा तीं वसलीं नसतीं, परंतु शहरें स्थापन झाल्यामुळें कायदे झाले, नीति झाली, न्याय झाला, व जनरूढि ह्मणून झाली. नंतर मनुष्याच्या

स्वभावांत सौम्यपणा येऊं लागला, व त्याला सत्यमार्गानें जाण्याची आवड ह्मणून होऊं लागली. त्यामुळें असें झालें कीं, संसारामध्यें सुरक्षितपणा अधिक वाढला. आणि मनुष्यें एकमेकांना गरज पडेल तें पुरवूं लागल्यामुळें, कोणाला कांहीं उणें पडेनासें झालें.

या गोष्टीचा विचार करण्यांत आह्मी वाजवीपेक्षां अधिक पाल्हाळ केला आहे. याचें कारण येवढेंच कीं, **पानेशियसानें** मोठें वाक्पांडित्य करून असें सिद्ध केलें आहे कीं, कोणीही मनुष्य घ्या—तो सेनापति असो अथवा राज्याधिपति असो–त्याला जर मनुष्यांची मदत नाहीं तर त्याच्या हातून जरा सुद्धां पराक्रम होणार नाहीं. व ह्या ह्मणण्याला पुष्टता आणण्याकरतां त्यानें थेमिस्टोक्लीस, पेरिक्लीस, आलेक्सांडर, आजेसिलास यांचीं उदाहरणें दिलीं आहेत; व ह्मटलें आहे कीं, त्यांना जर मनुष्यांची कुमक नसती तर त्यांच्या हातून मोठमोठे पराक्रम घडले नसते. परंतु ही गोष्ट इतकी उघड व निर्विवाद असून त्यानें विनाकारण उदाहरणें दिलीं आहेत. तसें करण्याची जरूर नव्हती, हें दाखविण्याकरतां अंमळ पाल्हाळ करावा लागला.

मनुष्यें एकवट झालीं असतां त्यांपासून मोठमोठे फायदे होतात, हें जरी खरें आहे, तरी मनुष्यासारखा घातक प्राणी दुसरा नाहीं हेंही सांगितलें पाहिजे. **दिकियारकस** ह्मणून ग्रीक लोकांमध्यें एक विद्वान होऊन गेला. त्यानें, मानवजातीचा नाश कोणकोणत्या कारणांनीं होतो, याविषयीं एक ग्रंथ लिहिला आहे. त्यामध्यें, महापूर, वाखे, प्रळय, जनावरांच्या धाडी, इत्यादि कारणें सांगून, शेवृ-

टीं यानें असें ह्मटलें आहे कीं, हीं सर्व कारणें झालीं तरी त्यांहून मनुष्याचा नाश करण्याला मनुष्येंच अधिक कारणीभूत आहेत. ह्मणजे लढायांत व बंडांत जेवढीं मनुष्यें नाहींतशीं होतात, तेवढीं दुसऱ्या कोणत्याही कारणांनीं नाहींतशीं होत नाहींत.

आतां मनुष्याच्या अंगा मोठें हित करण्याचें व मोठा नाश करण्याचें सामर्थ्य आहे, हें जर निर्विवाद आहे तर शहाण्या पुरुषानें लोकांची प्रीति संपादन करावी, व त्यांजपासून आपलें हित करून घ्यावें, हेंच योग्य आहे. परतु लोकांची प्रीति संपादन करावी कशी, हा प्रश्न राहिला त्याचा उलगडा करूं या. या संबधानें पुढील लेख कदाचित् वाजवीपेक्षां लांब वाटेल; परंतु विषयाच्या महत्वाशीं त्याची तुलना केली तर, तो असावा त्याहून लहान आहे, असेंच दिसून येईल.

मनुष्यें दुसऱ्यासाठीं जें जें कांहीं करितात—मग तें त्याची प्रतिष्टा वाढविण्यासाठीं असो अथवा कीर्ति वाढविण्यासाठीं असो—तें तें सारें पुढील कारणांमुळें करितात; ह्मणजे, त्याजवर उपकार करावे ह्मणून, किंवा त्याची योग्यता त्यांना मोठी वाटत असल्यामुळें त्याचा नांवलौकिक व्हावा ह्मणून; किंवा त्याजवर त्यांचा विश्वास असतो व आपण आपलेंच हित साधीत आहों असें त्यांना वाटतें ह्मणून किंवा त्याच्या अधिकाराची त्यांना भीति असते ह्मणून; किंवा त्याजपासून कांहीं तरी लाभ होईल अशी आशा असते ह्मणून; किंवा ते जें करितात तें करण्यासाठीं त्यांना पैसा मिळतो ह्मणून. या सर्वांमध्यें शेवटलें कारण अति निंद्य व हीन आहे, व तें पैसा घेणारासच

नव्हे, तर पैसा देणारासही लांछनकारक आहे. कारण खऱ्या मार्गानें जी गोष्ट व्हावी, ती जर पैशांची लालूच दाखवून करून घ्यावी लागते, तर तें चिन्ह बऱ्याचें नव्हे. परंतु कधीं कधीं तसें करावें लागतें. यासाठीं अशा वेळीं पैशाचा उपयोग कोणत्या रीतीनें करावा याविषयीं पुढें विचार करूं. सध्या, ज्या गोष्टींचा सद्गुणांशीं निकट संबंध आहे, त्यांचाच विचार करूं.

मनुष्यें दुसऱ्याच्या ताब्यांत व अधिकाराखालीं रहाण्यास कबूल होतात याचीं कारणें अनेक असतात. त्यानें त्यांच्यावर मोठे उपकार केलेले असतात; किंवा त्याची औदार्यबुद्धि मोठी असते; किंवा त्याच्या अंगीं अनुपम सद्गुण असतात; किंवा त्याजपासून आपल्याला लाभ होईल अशी त्यांना आशा असते; किंवा आपण स्वसंतोषानें त्याचे अंकित झालों नाहीं, तर तो आपणास जबरदस्तीनें आहारीं आणील, ही त्यांना भीति असते; किंवा त्यांना बक्षीस मिळण्याची उमेद असते; किंवा ते वचनास भुललेले असतात; किंवा, त्याजबद्दल त्यांना द्रव्य मिळतें. आतां हीं सारीं कारणें जरी झालीं, तरी आपल्यावर लोकांची प्रीति असल्यानें जशी आपल्या अधिकारास स्थिरता व मजबुती येते तशी दुसऱ्या कोणत्याही उपायांनीं येत नाहीं. व लोकांना आपली भीति वाटत असली तर त्यामुळें आपल्या अधिकाराला जेवढा धोका येतो तेवढा दुसऱ्या कशानें येत नाहीं. **एनियस** नामक कवीनें एकें ठिकाणीं ह्मटलें आहे कीं—" लोक ज्याला भितात, त्याचा ते द्वेष करितात; व ज्याचा द्वेष करितात त्याच्या नाशाची ते इच्छा धरितात" हें ह्मणणें अगदीं खरें आहे. त्याचा

पुष्कळ वेळां अनुभव आलेला आहे. व नुकत्याच * झाले-ल्या गोष्टीवरूनही उघड होतें कीं, जनांच्या द्वेषापुढें कशा-चाही जोर चालत नाहीं. जनांचा द्वेष किती प्रबल आहे हें एकट्या सीझराच्याच मरणानें सिद्ध होतें असें नाहीं; त्याला आणखीही पुष्कळ प्रमाणें आहेत. कारण आज-पर्यंत जे जुलमी राजे होऊन गेले त्यांतून ज्याला सीझ-राप्रमाणेंच मृत्यु आला नाहीं असे विरळा. ही गोष्ट आश्चर्य करण्यासारखी आहे असें नाहीं. कारण, जीवाचें संरक्षण करायाला भीति हाच जर शिपाई असला तर त्याजवर भरंवसा ठेवून उपयोग नाहीं; तो केव्हां फिरेल याचा नेम नाहीं. परंतु त्या ठिकाणीं प्रीति हा शिपाई असला तर बिनधास्त राहतां येईल; कारण तो कधींही निमकहराम होणार नाहीं.

परंतु गोम अशी आहे कीं, जे दुसऱ्याला बळजोरीनें आपल्या ताब्याखालीं ठेवितात, त्यांना सक्ती केल्यावांचून चालत नाहीं. एकाद्या धन्याचे गुलाम जर त्याला अनावर झाले, तर त्याला त्यांजवर जुलूम करावाच लागतो. परंतु स्वतंत्र राज्यामध्यें जे लोक भीति उत्पन्न करण्यासारखेंच आचरण करितात त्यांच्या मूर्खपणाची सीमाच होते, असें ह्मटलें पाहिजे. कारण एकाद्या शक्तिमान पुरुषाच्या सत्ते-मुळें कायदे किती जरी गडप झाले, किंवा स्वातंत्र्याला केवढा जरी धक्का बसला, तरी ते कायदे व स्वातंत्र्य हीं कधींना कधीं तरी, कोणत्याना कोणत्या रीतीनें, पुढें आल्यावांचून रहाणार नाहींत. व जेव्हां तो दिवस येतो तेव्हां एवढें मात्र होतें कीं, लोकांना सदोदित स्वातंत्र्य

* हा लेख सीझर याच्या मरणास अनुलक्षून आहे.

असतें तर जीं कृत्यें त्यांच्या हातून झालीं नसतीं, तीं करण्यास ते उद्युक्त होतात. व कांहीं वेळ स्वातंत्र्य गेल्यामुळें त्यांचें आचरण, कोंडलेल्या सर्पाच्या दंशाप्रमाणें, विशेष आवेशाचें होतें. याकरतां, आपण भीति उत्पन्न करण्याचें सोडून प्रीति संपादन करण्याचा प्रयत्न करावा हाच उत्तम मार्ग होय. येणेंकरून आपल्याला सुरक्षितपणा लाभेल एवढेंच नाहीं, तर आपली सत्ता व आपली हुकमत ह्याही वाढतील. व राज्यकारभारांत किंवा संसारांत आपल्याला जें जें पाहिजे तें तें सहज प्राप्त होईल. परंतु या सर्वांहून मोठा लाभ म्हटला म्हणजे चित्ताची स्वस्थता—तीही मिळेल; भीति उत्पन्न करण्यासारखें वर्तन केल्यानें ती मिळत नाहीं. कारण, ज्यांनीं आपल्याला भ्यावें अशी लोकांची इच्छा असते त्यांनाच ते भिऊं लागतात; व असा परिणाम होणें हें स्वाभाविक आहे.

सिराक्यूज येथील राजा थोरला डिओनीझियस याची अशी गोष्ट सांगतात कीं, आपण न्हाव्याकडून हजामत करविली तर तो कदाचित वस्त्रानें आपला घात करील, या भीतीनें तो आपले केस निखाऱ्यानें होरपळीत असे. त्या त्या वेळीं त्याला काय काय वेदना होत असतील, व त्याच्या मनाची स्थिति काय होत असेल, याची वाचकांनींच कल्पना करावी. दुसरें उदाहरण फेरे येथील राजा आलेक्सान्डर याचें घ्या. याजविषयीं असा इतिहास आहे कीं, बायकोवर (तिचें नांव थेब्रे) त्याचें जरी अतिशय प्रेम होतें, तरी मेजवानीहून तिच्या मंदिरांत जावयाचें झालें तर तो एकदम जात नसे. अगोदर तो एका गुलामाला नागव्या तरवारीनिशीं आंत पाठवी व दुसऱ्या नोकरांकरवीं

राणीच्या दासींच्या पेट्या उघडवून वस्त्रामध्यें कोणी कांहीं हत्यार छपवून ठेविलें आहे कीं काय हें पाहवी. व मग आपण खोलींत प्रवेश करी. मूर्ख बिचारा! बायकोपेक्षां गुलाम अधिक विश्वासू त्याला वाटावाना? पण तेंच खरें झालें. तो बाहेरख्याली आहे अशा संशयावरून तिनेंच त्याचा प्राण घेतला. अशींच आणखींही उदाहरणें आहेत. सारांश, मनष्याची सत्ता केवढीही असली तरी तिचा पाया जर भीतिवर आहे तर ती दीर्घकालपर्यंत टिकणार नाहीं. परंतु तिचा पाया जर प्रीतीवर आहे तर तिला कशाचीही भीति नाहीं. याविषयीं जास्ती उदाहरणें देण्याची आवश्यकता नाहीं.

जनप्रीतीचें सामर्थ्य जर एवढें मोठें आहे, तर, सत्य न सोडतां व आपला मानभंग न होऊं देतां, ती प्रीति कशी मिळवावी याचा विचार करूं या. परंतु तो विचार करण्यापूर्वी हें सांगितलें पाहिजे कीं, त्या प्रीतीची सर्वांना सारखी गरज असते असें नाहीं. एकाद्या मनुष्याला पुष्कळ लोकांच्या प्रीतीची गरज आहे, कीं त्याला थोड्या लोकांची प्रीति असली तरी चालेल, हें ठरविण्यापूर्वी, तो मनुष्य कोणत्या स्थितींतला आहे व त्याचे उद्देश काय आहेत, हें पाहिलें पाहिजे. प्रीतीचें प्रमाण त्याच्या उद्देशांवर अवलंबून असतें. परंतु तें कसेंही असलें तरी एवढी गोष्ट निर्विवाद आहे कीं, जे आपले मित्र आहेत, आपलें चांगलें व्हावें असें ज्यांच्या मनांत आहे, व आपले गुण पाहून जे हर्षित होतात, त्यांचा लोभ मनापासून आपल्यावर असणें हें अगदीं अवश्य आहे. त्यावांचून चालायाचें नाहीं. उंच स्थितींतला मनुष्य व मध्यम स्थितींतला मनुष्य

या दोघांनाही ही गोष्ट सारख्या अगत्याची आहे, व दोघांनाही ती सारख्याच उपायांनीं प्राप्त होण्यासारखी आहे. नांवलौकिक, प्रतिष्ठा, व अखिलजनप्रीति यांविषयीं सर्वांची इच्छा सारखी असते असें नाहीं. परंतु ज्या पुरुषाला हीं साधनें अनुकूल आहेत त्याला इतर फायदे करून घेण्याला त्यांपासून मोठीच मदत होते.

खऱ्या व उत्तम जनप्रीतीला तीन गोष्टी पाहिजेतः—१, साधारण लोकांनीं आपल्यांवर लोभ ठेविला पाहिजे; २, त्यांनीं आपल्यावर विश्वास ठेविला पाहिजे; व ३, आमच्या गुणांची तारीफ होऊन, आम्ही प्रतिष्ठेस पात्र आहों असें त्यांना वाटलें पाहिजे. ह्या गोष्टी ज्या साधनांनीं व्यक्तींकडून प्राप्त होतात, त्याच साधनांनीं बहुधा त्या सामान्य लोकांकडूनही प्राप्त होतात. परंतु जनांची प्रीति आकर्षण करून घेण्याचा दुसराही एक मार्ग आहे.

जनप्रीतीचीं जीं तीन अंगें वर सांगितलीं त्यांतील पहिल्या अंगाविषयीं, म्हणजे लोकांचा लोभ कसा संपादन करावा, याविषयीं विचार करूं.

साधारण जनांची प्रीति मिळविण्याचें मुख्य साधन म्हटलें म्हणजे त्यांच्यावर उपकार करणें हें होय. त्याच्या खालोखाल, उपकारबुद्धि धरणें हें होय. म्हणजे उपकार करण्याचें साधन आपल्या हातीं नसलें, तरी उपकारबुद्धि धरावी. व तेंही नाहीं तर, औदार्याविषयीं आपला प्रसिद्धी होईल असें करावें. कारण औदार्य, उपकारबुद्धि, न्यायीपणा, प्रामाणिकपणा इत्यादि सद्गुणांविषयीं एकाद्याची कीर्ति ऐकूनच साधारण लोक भुलतात व त्याजवर लोभ ठेवितात. आतां जनांचा विश्वास आपल्यावर बसेल

असें करण्यास दोन साधनें आहेत. तीं हीं कीं, शहाणपणा व सत्याचरण—हे गुण आमच्या अंगीं आहेत अशी त्यांची खातरी झाली पाहिजे; ह्मणजे आह्मांवर त्यांचा विश्वास पूर्णपणें बसेल. कारण साधारण नियम असा आहे कीं, जे आमच्यापेक्षां शहाणे आहेत असें आह्मांस वाटतें, ज्यांना पुढें होणारें समजतें, व आणीबाणीचा प्रसंग आला असतां त्यांतून पार कसें पडावें हें समजतें, त्यांजवर आमचा विश्वास सहज बसतो. लोकांच्या मतें जगांत उपयोगीं पडणारें व खरें शहाणपण तें हेंच. तसेंच जे प्रामाणिक व विश्वासू आहेत, अर्थात् जे चांगले लोक आहेत, त्यांच्यावरही आमचा विश्वास असतो; तो इतका कीं, ते लबाडी किंवा अन्याय करतील असा संशय सुद्धां आमच्या मनांत येत नाहीं; व ह्मणूनच आमचे जीव, आमचें द्रव्य, आमचें घरदार हीं अशांच्या स्वाधीन करतांना आह्मांस तिळमात्रही संदेह न येतां, आह्मी योग्य व सुरक्षितपणाचें कृत्य करतों असेंच आह्मांला वाटतें.

परंतु शहाणपणा, व न्यायीपणा अथवा प्रामाणिकपणा, या दोहोंतून न्यायीपणा हा गुण विशेष प्रबल आहे. कारण शहाणपणा नसला तरी फक्त न्यायीपणाचेंच वजन पुष्कळ असतें. परंतु शहाणपण असून न्यायीपणा किंवा प्रामाणिकपणा जर नाहीं तर लोकांचा विश्वास बसणार नाहीं. कारण, ज्या मनुष्याच्या अप्रामाणिकपणाविषयीं आमची खातरी झालेली असते, तो जितका जितका अधिक शहाणा, तितका तितका अधिक लुच्चा असें आह्मांस वाटतें, व तितका तितका आह्मी त्याचा अधिक तिरस्कार करतों. शहाणपणा व प्रामाणिकपणा हे दोन्ही

गुण जर एकाच ठिकाणीं आहेत तर जनांचा विश्वास ओढून घेण्याला त्यांची शक्ति अमर्याद होईल. शहाणपण नसून फक्त प्रामाणिकपणाच आहे तरीही मोठें कार्य होईल. परंतु प्रामाणिकपणा नसून नुसतें शहाणपणच आहे तर कांहीं होणार नाहीं.

लोकप्रीतीचें तिसरें लक्षण हें कीं, आमचे गुण लोकांनीं वाखाणून आम्ही वढतीस योग्य आहों असें त्यांस वाटलें पाहिजे. आतां लोकांची साधारण रीतीनें चाल अशी आहे कीं, जें कांहीं भव्य व त्यांच्या समजापलीकडचें आहे त्याला ते मोहित होतात; व ज्या मनुष्याच्या अंगीं कांहीं अलौकिक गुण आहे असें त्यांना वाटतें त्या मनुष्याची ते फार तारीफ करितात. व ज्यांच्यामध्यें कांहीं गुण नाहीं, कांहीं पाणी नाहीं, किंवा कांहीं पुरुषार्थ नाहीं असें त्यांना वाटतें, त्यांना ते तुच्छ मानितात. ज्यांच्याविषयीं त्यांचा अभिप्राय वाईट असतो अशा सर्वच लोकांना ते तुच्छ मानितात असें नाहीं. उदाहरणार्थ, जे अधम, निंदक, ठक व अनाचार करण्यास प्रवृत्त होणारे आहेत असें त्यांना वाटतें, त्यांच्याविषयीं लोकांचें मत यद्यपि वाईट असलें तथापि ते त्यांना कस्पटासमान कांहीं लेखीत नाहींत हें निर्विवाद आहे. जे अजागलवत् स्वतःला निरुपयोगी व दुसऱ्यालाही निरुपयोगी असतात, ज्यांच्यांत कांहीं दम नसतो, ज्यांना कांहीं व्यासंग होत नसतो, व ज्यांना स्वतःविषयीं देखील काळजी नसते, अशांचाच ते तिरस्कार करितात.

परंतु ज्यांचे गुण सर्वांपेक्षा उत्तम आहेत, ज्यांच्यांत कांहीं न्यून नाहीं, व विशेषेंकरून जे इतरांना दुर्निवार

अशा मोहपाशांपासून मुक्त आहेत असें लोकांना वाटतें, ते वाखाणले जातात. यांत मोठेंसें आश्चर्य आहे असें नाहीं. कारण, सुखविलासाला मोहित होऊन विषयाचे दास झाल्यानें बहुतेक जन सदाचरणापासून च्युत होतात; दुःखाग्नीच्या ज्वाळा लागल्यानें पुष्कळांची अपार त्रेधा उडून जाते; आणि जन्म मरण, संपत्ति व विपत्ति यांचा तर सर्व मनुष्यांच्या चित्तवृत्तींवर मोठाच परिणाम होतो. असें आहे तर ज्यांचें मन इतकें विशाल आहे कीं, त्यांना ह्या सर्व गोष्टी तुच्छ वाटतात, जे एखादा प्रौढ व प्रगल्भ विषय मिळाला असतां तल्लीन व तन्मय होऊन जातात, त्यांच्या गुणांचें सौंदर्य व तेज यांची तारीफ कोण करणार नाहीं?

यावरून मनाची प्रौढता असल्यानें जनांत तारीफ होते हें उघड आहे. परंतु इतकें झालें तरी न्यायीपणामुळें ती अधिक होते. न्यायीपणा अथवा प्रामाणिकपणा हा गुण सामान्य जनांला अलौकिक वाटतो, व ज्याच्या अंगीं हा गुण असतो त्याच्याठायीं दुसरे गुण नसले तरी त्याला सज्जन म्हणतात. व तें बरोबर आहे. कारण मृत्यु, दुःख, स्वदेशान्तर, विपत्ति, यांचें ज्याला भय वाटतें, किंवा तद्विरुद्ध गोष्टींची आवड वाटते, तो न्यायी नव्हे. तेव्हां जो न्यायी आहे त्याची थोरवी किती हें सांगितलें पाहिजे असें नाहीं. पुनः, जो न्यायी आहे तो पैशाच्या लालचीनें न्यायभ्रष्ट होणार नाहीं; व जो मनुष्य पैसा खात नाहीं त्याची लोक फार तारीफ करितात. जो लांचाला वळत नाहीं तो अग्नीमध्यें घातलेल्या सोन्याप्रमाणें शुद्ध आहे असें ते समजतात. सारांश, जनप्रीतीच्या ज्या तीन गोष्टी

वर सांगितल्या त्या तीन्ही एकऱ्या न्यायीपणामुळें येतात. म्हणजे, पुष्कळांचें हित करण्याकडे न्यायीपणाचा कल असतो, त्यामुळें लोकांचा लोभ जडतो; त्याच कारणामुळें त्यांचा विश्वासही पटतो; व ज्या वस्तूंविषयीं बहुतेक जन हांवरा असतो त्या वस्तूंकडे न्यायी पुरुष दुर्लक्ष करतो व त्या तुच्छ गणतो, यामुळें लोकांकडून त्याची तारीफ होते.

न्यायीपणा म्हणजे प्रामाणिकपणा हा सद्गुण इतका अवश्य आहे कीं, मनुष्य जरी एखाद्या खेड्यांत किंवा एकान्तवासांत जाऊन राहिला, तरी तेथेंही त्यानें प्रामाणिकपणानें राहिलें पाहिजे; जो त्याप्रमाणें रहाणार नाहीं त्याला अप्रामाणिक म्हणतील; त्याला आपलें संरक्षण करण्यासाठीं कांहीं उपाय राहणार नाहीं; व यामुळें त्याला वारंवार संकटें सोसावीं लागतील. जे लोक क्रयविक्रय करितात, भाड्यानें देतात घेतात, किंवा कामधंदा चालवितात, त्यांना तर प्रामाणिकपणा अगदीं जरूर आहे; त्याखेरीज त्यांचें चालावयाचें नाहीं. सारांश, या गुणांचें प्राबल्य एवढें मोठें आहे कीं, जे लोक दुष्कर्में किंवा अपराध करून आपली उपजीविका करितात, त्यांच्या अंगीं प्रामाणिकपणाचा तिळाएवढा तरी अंश असल्यावांचून त्यांचा निर्वाह लागणार नाहीं. जे लोक टोळ्या करून चोऱ्या करितात, त्यांच्यामध्यें जर एकानें दुसऱ्यास ठकविलें किंवा नागविलें तर त्याला टोळींतून हांकून देतात. तसेंच त्यांचा नाईक असतो त्यानें जी लूट मिळेल तिचे सारखे वांटे केले तर बरें; नाहीं तर त्याचे साथी त्याचा जीव घेतात किंवा त्याची टोळी सोडून जातात. इतकेंच

नाहीं, तर असें सांगतात कीं, चोरांमध्यें कायदे देखील असतात; व त्यांप्रमाणें ते चालतात.

आतां न्याय्यतेची शक्ति जर एवढी मोठी आहे, कीं तिच्या योगानें चोरांचेंही बळ दृढ होऊन वृद्धिंगत होतें, तर जेथें कायदे व न्यायासनें आहेत, अशा सुव्यवस्थित राज्यामध्यें तिचें सामर्थ्य किती असावें बरें? मला तर वाटतें कीं, **मीड** लोकांमध्येंच नव्हे, तर आमच्या पूर्वजांमध्यें सुद्धां अशी वहिवाट असे कीं, सर्व लोकांना सारखा न्याय मिळावा म्हणून जे सज्जन असत त्यांनाच राज्यपद देत असत. बलिष्ठांपासून उपद्रव होऊं लागला, म्हणजे निर्बल बिचारे लोक कोणी एकादा सज्जन पाहून त्याचे पाय धरीत. तो निराश्रितांचें रक्षण करी; इतकेंच नाहीं, तर, न्यायाची राज्यव्यवस्था स्थापित करून तो रावरंकांना सारखे हक्क देई. ज्या कारणांनीं राजे झाले त्याच कारणांनीं कायदेही झाले. कारण, सर्वांना सारखा न्याय असावा अशी इच्छा मनुष्यें सदोदित धरीत आलीं आहेत; व कायदे असल्यावांचून ती इच्छा पूर्ण करतां येत नाहीं. जोंपर्यंत न्यायी व सज्जन असे पुरुष लोकांना मिळत गेले, तोंपर्यंत ते स्वस्थ होते. पण जेव्हां अशा पुरुषांची कमताई पडूं लागली, तेव्हां सर्वांला सारख्या रीतीनें लागू होतील असे कायदे त्यांनीं सुरू केले.

याकरितां आपण न्याय्यतेला परमपूज्य मानून हरप्रयत्नांनीं ती आपल्या आचरणांत आणावी. येणेंकरून आपली कीर्ति वाढेल व आपल्यावरची जनांची प्रीति दृढ होईल.

आतां, ज्याप्रमाणें द्रव्य मिळविण्याचा, व त्यापासून

रोजचा खर्च भागविण्याच नव्हे, तर धर्माचीं व परोपकाराचीं कृत्यें करतां येण्यासारखा फायदा व्हावा अशा रीतीनें त्याची व्यवस्था करण्याचा मार्ग आहे, त्याचप्रमाणें कीर्ति संपादन करण्याचा व ती वृद्धिंगत करण्याचाही मार्ग आहे. सॉक्रेटिसानें म्हटलें आहे कीं, कीर्ति मिळविण्याला एक सरळ व सोपा मार्ग आहे. तो हा कीं–" जसे आपण आहों असें लोकांना दाखवितों, तसेच आपण खरोखर व्हावें." हें म्हणणें अगदीं खरें आहे. जर कोणाला वाटत असेल कीं, आपल्या बोलण्याचालण्यांत व चेहऱ्यांत दांभिकपणा व कपटभाव ठेविल्यानें आपण सहज कीर्ति संपादन करूं, तर ती त्याची मोठीच चूक आहे. खरी कीर्ति असते ती फार खोल असते व तिचा फैलावही फार विस्तीर्ण होतो; परंतु खोटी कीर्ति असते ती तेव्हांच मावळून जाते. कारण, असत्य असतें तें फार कालपर्यंत टिकत नाहीं. याकरितां जनांची खरी प्रीति आपल्यावर असावी अशी ज्याची बळकट इच्छा आहे, त्यानें न्याय्यतेपासून उत्पन्न होणारीं सर्व कर्तव्यें केलीं पाहिजेत. हीं कर्तव्यें कोणतीं हें मागें सांगितलेंच आहे.

आपली योग्यता लोकांच्या नजरेस आणून आपण जसे आहों तसेच लोकांनाही वाटावें असें करणें मोठेंसें कठिण नाही. परंतु ज्या प्रकारचे मनुष्य आपण आहों असें लोकांना वाटावें अशी आपली इच्छा असते, त्या प्रकारचे मनुष्य आपण होणें हें सोपें नाहीं. म्हणून त्याविषयीं कांहीं नियम सांगितले पाहिजेत.

वडिलांच्या नांवलौकिकानें किंवा अन्य कारणांनीं जो मनुष्य लहानपणींच प्रसिद्धीस आलेला असतो, त्याजकडे

मराठा ग्रंथ संग्रहालय

सर्वांचे डोळे लागलेले असतात. तो कोणत्या रीतीने राहतो व काय करतो याविषयीं सर्व लोक विचारपूस करीत असतात. आणि ज्याप्रमाणे [illegible] असलेल्या पदार्थाचा कोणताही भाग लपत नाहीं, त्याप्रमाणें त्या मनुष्याचें करणें व बोलणें हीं गुप्त राहात नाहींत. कीर्ति ही त्याला जन्मतःच मिळालेली असते, तेव्हां ती मिळविण्याची खटपट करण्याची त्याला जरूर नसते. परंतु जे पुरुष लहानपणीं गरीब व अज्ञान स्थितींत असल्यामुळें अप्रसिद्ध असतात, त्यांनीं तरुणपण प्राप्त झाल्याबरोबर मोठी महत्वाकांक्षा धरून ती सरळ मार्गांनीं पुरी पाडण्यास झटलें पाहिजे. यांत त्यांना फारशा अडचणी येणार नाहींत. कारण जे तरुणपणामध्यें उद्योग करितात त्यांचा कोणी हेवा करीत नाहींत; इतकेंच नव्हे तर उलटी त्यांना मदत करितात. आतां नव्या ज्वानांना कीर्ति मिळविण्याचा पहिला मार्ग म्हटला म्हणजे युद्धपराक्रम हा होय. या मार्गाचें अवलंबन करून, आमच्या पूर्वजांनीं मोठमोठ्या लढाया मारिल्या व दिगंतरीं कीर्ति गाजविली; परंतु हल्लींच्या स्थितीमध्यें तो मार्ग आपणाला खुंटला आहे. यासाठीं आपण बाकीच्या साधनांकडे वळूं.

सर्व गोष्टींमध्यें बाहुबलापेक्षां बुद्धिबलाचा प्रभाव जास्त पडतो. यासाठीं जीं कामें विचाराचीं व विवेकाचीं आहेत तीं केल्यानें विशेष महत्व वाढतें. मिताचरण, आईबापांची सेवा, आप्तजनांवर प्रीति, इत्यादि कर्तव्यें केल्यानें पूर्व वयांत वहावा होते. तसेंच जे तरुण सुज्ञ व स्वदेशकल्याण करणाऱ्या पुरुषांच्या संगतीनें असतात ते लवकर पुढें येतात. कारण अशा लोकांच्या बरोबर त्यांना वारंवार

पाहून लोकांना असें वाटतें कीं, पुढें हेही त्यांच्यासारखेच होतील.

लौकिक मिळविण्यामध्यें भाषणशक्ति फार उपयोगी पडते. भाषणामध्यें दोन प्रकार आहेत. एक प्रकार संभाषणांत दृष्टीस पडतो, व दुसरा वादविवादांत. वादविवादांत भाषणाचा जो प्रकार दृष्टीस पडतो त्याला वक्तृत्व म्हणतात. जनप्रीति ओढून घेण्यास प्रौढ व रसाळ अशा संभाषणशक्तीचा जोर मोठा आहे, हें ऐकून कित्येकांना आश्चर्य वाटेल. परंतु तें खरें आहे. मासेडोनचा राजा फिलिप यासारख्या शहाण्या व पराक्रमी पुरुषानें आपल्या पुत्रास जीं पत्रें लिहिलीं आहेत, त्यांत प्रजेशीं व सैन्याशीं मोठ्या प्रेमभावानें भाषण करून त्यांची मनें आकर्षण करून घ्यावीं, असा उपदेश केला आहे. समाजामध्यें जें भाषण होतें त्याची शक्ति विलक्षण असते. कारण, वक्त्याच्या वक्तृत्वप्रवाहाच्या ओघाबरोबर श्रोत्यांचीं मनें वाहून जातात. ज्यावेळीं एखाद्या विचारी वक्त्याचें भाषण लोक ऐकतात, त्यावेळीं ते थक्क होऊन जातात, व त्यांना असें वाटतें कीं, यासारखा हुशार व शहाणा दुसरा कोणी या जगांत नसेल. तरुण मनुष्यांमध्यें वक्तृत्वशक्ति असून जर आणखी मर्यादा व प्रौढीही आहे, तर त्याची मोठीच वाहवा झाल्यावांचून राहणार नाहीं.

भाषण करण्याचे तीन ठिकाणीं प्रसंग येतात,— राजसभेमध्यें, जनसमूहामध्यें, व न्यायासनापुढें. यांपैकीं न्यायासनापुढें भाषण होतें त्याला वकिली ह्मणतात; व असल्या भाषणाची विशेष चहा होते. वकिली दोन प्रकारची असते; फिर्यादी किंवा वादीतर्फें, आणि आरोपी किंवा

प्रतिवादीतर्फे. यांतून आरोपीतर्फे वकिली करण्यांत अधिक भूषण मानतात. परंतु फिर्यादीतर्फे भाषण करूं नये असें नाहीं. इतकेंच कीं, देशाच्या हितासाठीं फिर्याद नसली तर फिर्यादीचा पक्ष वारंवार स्वीकारूं नये; कारण तेणेंकरून बदनाम होण्याचा संभव असतो. परंतु देशकल्याणासाठीं कितीही प्रसंगीं फिर्यादीची बाजू धरिली तरी त्यांत लांच्छन नाहीं. त्यांत एवढी गोष्ट पक्की लक्षांत ठेविली पाहिजे कीं, निरपराधी मनुष्यावर आरोप ठेवून त्याजवर खटला करूं नये. तसें करणें मोठें पाप आहे. कारण मनुष्यमात्राच्या कल्याणासाठीं जी वक्तृत्वशक्ति ईश्वरानें आपल्याला दिली आहे तिचा उपयोग सज्जनाचा छळ करण्यांत जर आपण केला तर आपण किती दोषी होऊं! परंतु असें असलें तरी अपराधी मनुष्याचा बचाव होण्यासारखें भाषण करूं नये असें नाहीं—तो अति अधम, चांडाळ व देवनिंदक मात्र नसावा. अपराध्याच्या तर्फे भाषण करावें अशी लोकांची इच्छा असते; तशी चाल पडून गेली आहे; व तसें करणें भूतदयेलाही अनुसरून आहे. सर्व निवाड्यांमध्यें सत्याचा शोध करणें हें काम न्यायाधीशाचें आहे, वकिलांचें नव्हे. वकिलानें कधीं कधीं जी गोष्ट सत्य नाहीं ती सत्यासारखी आहे असें प्रतिपादन केल्यास हरकत नाहीं. तत्वज्ञानाविषयीं लिहितांना असें म्हणूं नये हें खरें, परंतु प्यानेशियसाचेंही तसेंच मत आहे. आरोपीतर्फेनें भाषण केल्यानेंच मोठी कीर्ति व जनप्रीति प्राप्त होते. व दैवयोगानें आरोपीवर जर एखाद्या प्रबल मनुष्याच्या जुलमामुळें प्रसंग गुदरलेला असला, तर त्याची सुटका केल्यानें फारच मोठी कीर्ति होते.

कीर्ति मिळविण्याचा दुसरा मार्ग परोपकार व औदार्य हा होय. परोपकार करण्याचे दोन प्रकार आहेत; म्हणजे जो निराश्रित आहे त्याला दोन प्रकारांनीं मदत करतां येते— १ स्वश्रमानें, व २ द्रव्यानें. आतां द्रव्यसाधनानें दुसऱ्याचें साहाय्य करणें हें फार सुलभ आहे; व जो श्रीमंत आहे त्याला तें कांहींच वाटत नाहीं. परंतु स्वश्रमद्वारा मदत करणें म्हणजे अंमळ कठिण आहे; व त्यामुळें, जो दुसऱ्यासाठीं जातीनें खपतो त्याची वहावा होऊन कीर्ति होते. वास्तविक पाहिलें तर, जो द्रव्यानें मदत करितो व जो श्रमानें मदत करितो त्या दोघांचीही उपकारबुद्धि सारखीच उदार असते. परंतु त्यांच्यांत भेद इतकाच असतो कीं, एकाच्या कृतीनें त्याच्या पदरचीं पुंजी हळू हळू विरघळून जाते, व दुसऱ्याच्या कृतीनें त्याच्या सद्गुणांस झरा सुटतो. याचा परिणाम असा होतो कीं, जो द्रव्यद्वारा परोपकार करतो त्याजजवळचें परोपकार करण्याचें साधन लवकरच नाहीसें होतें; व तो जेवढा जेवढा अधिक परोपकार करतो तेवढी तेवढी त्याची परोपकार करण्याची शक्ति लवकर नाहींशी होते. अर्थात् परोपकारानें परोपकाराचें साधन नष्ट होतें. परंतु जो श्रमद्वारा मदत करितो त्याचें असें होत नाहीं. एक तर, ज्यां ज्यांसाठीं तो श्रम करितो ते ते परोपकार करण्याच्या कामीं त्याचे सहकारी होतात. व दुसरें, श्रम करण्याची त्याला संवय लागून गेल्यामुळें कितीही मनुष्यांसाठीं श्रम करावे लागले तरी याची तयारी असते. फिलिप राजाला जेव्हां समजलें कीं, आपला पुत्र आलेक्झांडर हा मासेडोनियन लोकांची प्रीति संपादन कर-

याकरतां त्यांना बक्षिसें देतो, तेव्हां त्यानें पुत्राला एक सुंदर पत्र लिहिलें. त्यांत तो म्हणतो–" हें वेड तुझ्या डोक्यांत कसें भरलें नकळे. ज्या लोकांना तूं लांच देऊन वश करितोस ते तुझ्याशीं इमानीपणानें वागतील असें तुला वाटतें काय? हा आपला राजा नव्हे, तर मुनीम व मोदी आहे, असें लोकांकडून म्हणून घ्यावें अशी तुझी इच्छा आहे काय?" या पत्रांत बक्षिशीला लांच असें म्हटलें आहे तें अगदीं ठीक आहे. कारण ज्यांला ती मिळते तो बिघडतो व अधिकाची आशा करतो. हें पत्र फिलिपानें आपल्या मुलास लिहिलें खरें, परंतु तें सर्वांना लागू आहे.

श्रमानें दुसऱ्यास मदत करणें जरी अधिक प्रशंसनीय आहे व तसें केल्यानें पुष्कळ लोकांचें कल्याण होण्यासारखें जरी आहे, तरी कधीं कधीं आपल्याला द्रव्यही दिलें पाहिजे; द्रव्यद्वारा उपकार कधींच करूं नये असें नाहीं. जे पात्र व गरजू आहेत त्यांना आपल्या संपत्तीचा अंश दिलाच पाहिजे. परंतु तो बेताबातानें व सावधगिरीनें दिला पाहिजे. कारण, अविचारानें औदार्याचीं कृत्यें करून वडिलार्जित संपत्तीचें मातेरें केलें, असे पुष्कळ लोक आहेत. असें करणें हा वेडेपणा नव्हे काय? कांकीं, त्याच्या योगानें, उपकार करण्याची बुद्धि कायम राहून साधन नाहींसें होतें. परंतु त्याहूनही वाईट असा दुसरा एक परिणाम होतो. तो असा कीं, ह्या प्रकारची उधळपट्टी केली म्हणजे लोकांना नागविण्याची इच्छा उत्पन्न होते. कारण, जवळ कांहीं नाहींसें झालें म्हणजे दुसऱ्याचें हरण करावें असें वाटतें. व असें झालें म्हणजे

परोपकारापासून जनप्रीति प्राप्त व्हावयाची तें एकीकडेस राहून उलटा जनद्वेष उत्पन्न होतो. याकरतां आपली संपत्तीची पेटी फार जपून ठेवावी. परोपकार करण्याची वेळ आली तर, ती उघडतां येऊं नये अशा रीतीनें घट्ट बंद केलेली नसावी; किंवा पाहिजे त्याणें तींत हात घालावा अशा रीतीनें ती उघडीही नसावी. आपल्या शक्तीप्रमाणें ती इयत्तेमध्यें ठेवावी.

सढळ हाताचे लोक दोन प्रकारचे असतात—१ उधळे, २ उदार. उधळे असतात ते नाच तमाशे, मेजवान्या, मल्लांच्या कुस्त्या, नाटकें शिकार इत्यादि ज्या वस्तु क्षणिक आनंद देतात—परंतु ज्यांची लवकरच आठवणही नाहींशी होते—त्यांत पैसा हवातसा अघळपघळ खर्च करितात. परंतु जे उदार असतात ते आपल्या संपत्तीच्या साह्यानें दुसऱ्यांस शत्रूंच्या हातून सोडवितात, किंवा आपल्या मित्रांचें कर्ज आपल्या अंगावर घेतात. किंवा मित्राची मुलगी चांगल्या ठिकाणीं पडावी म्हणून त्याला पैशाची मदत करितात, किंवा त्याचा प्रपंच चालविण्याला व तो वाढविण्याला साह्य करितात.

थिओफ्रासृटस यानें 'संपत्ति' या विषयावर जो ग्रंथ लिहिला आहे, त्यांत पुष्कळ चांगले विचार आहेत. परंतु त्यामध्यें त्यानें उधळेपणाची तारीफ केली आहे, येवढी एक गोष्ट मात्र वाईट आहे. तो म्हणतो कीं, आपल्या खर्चानें नाच तमाशे करून सर्व जनांला रंजवावें हेंच सधनतेचें मुख्य भूषण आहे. परंतु ही त्याची चूक आहे. आम्हांला वाटतें कीं, औदार्याचीं जीं थोडींशीं उदाहरणें आम्हीं वर दिलीं आहेत, त्यांपासून जें सुख होतें तें मोठें

आहे, व तेंच खरें सुख. आरिस्टॉटल यानेंही उधळेपणाला दूषण दिलें आहे. तो म्हणतो कीं, शत्रूनें वेढलेल्या सैन्यांतील एखाद्या मनुष्यानें पाण्याच्या एवढ्याशा घड्याला तीन मोहरा दिल्या असें जर तुम्हांला कोणी सांगितलें, तर तुम्हांला तें खरें सुद्धां वाटणार नाहीं; किंवा वाटलेंच तर तुम्ही म्हणाल — "असेल बुवा; तसाच प्रसंग आला असेल." परंतु तुम्ही कांही जरी कारण सांगितलें तरी सर्वांना अतिशय आश्चर्य वाटल्यावांचून राहणार नाहीं. परंतु ज्यावेळीं आम्ही जनांसाठीं नाच तमाशे करितों त्यावेळीं कसली गरज पुरवायाची नसतांही एवढें मोठें द्रव्य वायां घालवितों हें आश्चर्य नव्हे काय? बरें, ज्यांच्यासाठीं एवढा खर्च करितों त्यांना तरी कितीसा आनंद होतो? फार थोडा व अल्पायू; व तोही जे उल्लू व विचारशून्य असतात त्यांनाच होतो. व त्यांना झाला तरी त्या नाच तमाशांचा कंटाळा आला म्हणजे त्यांची आठवणही होईनाशी होते. शेवटीं तो असें म्हणतो कीं, नाच तमाशे इत्यादिकांसाठीं पैसा खर्च करणें हें लहान मुलांना, मूर्ख स्त्रियांना, दासांना, किंवा जे नांवाचे स्वतंत्र असून दासांप्रमाणें वर्तन करितात त्यांनाच, आवडतें. ज्याला थोडा तरी समज आहे व ज्याला विचार करण्याची शक्ति आहे त्याला हें पसंत पडणार नाहीं.

तथापि आपल्या अंगीं कृपणतेचा दोष येईल असें करूं नये. योग्य वेळीं जनांच्या कल्याणासाठीं खर्च केलाच पाहिजे. दुष्काळाच्या प्रसंगीं पीडित जनांस धान्य फुकट किंवा फारच अल्प किमतीनें देऊन कितीएक पुरुषांनीं नांव केलें आहे. तसेंच जनांच्या

हितासाठीं वेशींच्या भिंती, गोद्या, बंदरें व पाण्याचे नळ इत्यादि बांधून कितीएक पुरुषांनीं आपली कीर्ति अजरामर करून ठेविली आहे. आतां नाटकगृहें, ढेलजा, नवीं नवीं देवालयें इत्यादि इमारती उभारण्यासाठीं खर्च करावा कीं नाहीं याविषयीं अंमळ संशय आहे. मोठमोठ्या विद्वान पुरुषांचें म्हणणें कीं, तसल्या कामीं पैसा घालूं नये. व प्यानेशियसाचेंहि मत तसेंच आहे. व पेरिक्लिसानें * ग्रीस देशामध्यें एक भव्य ढेलज उभारण्यासाठीं इतका पैसा खर्चला म्हणून त्याला कोणी कोणी दोष देतात. पण तें कसेंही असलें तरी बेतानें खर्च करावा तें चांगलें.

आतां परोपकार करणें हा जो औदार्याचा दुसरा प्रकार राहिला त्यांत सर्व प्रसंगीं एकच विचार धरून

---

* पेरिक्लीस हा आथेन्स येथील एका पिढीजाद्या घराण्यांतला पुरुष होता. तो जात्याच हुशार होता; व त्यांत उत्तम गुरूंच्या हाताखालीं विद्याभ्यास करून त्यानें आपलें बुद्धिबळ वाढविलें होतें. यामुळें तो लवकरच प्रसिद्धीस आला. त्यावेळीं सायमन म्हणून बडलोकांच्या पक्षाचा एक सरदार होता, तोच बहुतकरून राज्य-प्रकरणीं कामांत पुढारी असे. परंतु लोकांना तो आवडत नसे. पेरिक्लिसानें सायमनाच्या विरुद्ध पक्ष धरून सायमनाला हद्दपार करविलें. यामुळें तो लोकांचा आवडता झाला. पुढें पंधरा वर्षें-पर्यंत तो आथेन्स येथील प्रजासत्ताक राज्याचा अध्यक्ष व मुख्य अमलदार होऊन राहिला. तेवढ्या काळांत त्यानें आथेन्स शहर मोठ्याच भरभाटीस आणून सोडलें. व त्यावेळीं लोकांच्या मनोरं-जनार्थ व शहराला शोभा आणण्याकरतां त्यानें एक भव्य ढेलज बांधविली. याप्रमाणें पेरिक्लीस लोकांचीं मनें आपल्याकडे ओढून घेण्याचा हरप्रयत्न करीत असतांही त्यांनीं एकदां त्याचे सर्व अधि-कार काढून घेतले. प्रजासत्ताक राज्यामध्यें लोकांची कृपा असणें किती बेभरंवशाचें काम आहे हें दाखविण्यासाठीं पेरिक्लिसाचें उदाहरण देतात.

चालूं नये. जो विपद्ग्रस्त आहे त्याची गोष्ट निराळी, व जो विपत्तींत नसून आपली स्थिति अधिक चांगली कर-ण्याची खटपट करतो त्याची गोष्ट निराळी. जे विपत्ती-च्या झपाट्यांत सांपडले असतील— विपत्ति त्यांना त्यांच्याच गुणांनीं मात्र आलेली नसावी—त्यांना त्वरित मदत करावी हें योग्य आहे. परंतु जे विपत्तींत नसून आपली स्थिति सुधारण्याची इच्छा धरितात त्यांना अगदींच टाकूं नये. त्यांनाही साह्य करावें; पण अगोदर त्यांची योग्यायोग्यता पहावी. कारण असत्पात्रीं उपकार केल्यानें उपकारांचे अपकार होतात. परंतु जो मनुष्य चांगला आहे, जो उपकार स्मरतो, त्याला दिल्यानें द्विगुणित फायदा होतो. एकतर त्याला मदत होते; आणखी लोकांतही आपली वाहवा होते. कारण औदार्यामध्यें जेव्हां अविचार नसतो तेव्हां तें सर्वांना आवडतें; व समर्थाचें औदार्य ह्मणजे सामान्य जनांचें आश्रयस्थान असें मानून लोक औदार्या-ची मनापासून स्तुति करितात. याकरतां जेवढ्यांवर आपल्या हातून उपकार करवतील तेवढ्यांवर करण्याचा आपण यत्न करावा. व उपकार करावे ते अशा प्रका-रचे करावे कीं, ज्याच्यावर ते करायाचे त्याच्या मुलाबा-ळांना व नातवापणतवांना देखील उपकारांची आठवण राहील, व तीं कृतघ्न होणार नाहींत. जो मनुष्य उपकार स्मरत नाहीं, त्याचा सर्व लोक धिःकार करितात, व कृतघ्नतेमुळें औदार्य खुंटून आपलें नुकसान होतें असें त्यांना वाटून, ते कृतघ्न मनुष्याला आपला शत्रु समजतात.

ज्याप्रमाणें दुसऱ्यांना देतांना मनुष्यानें सढळ हातानें द्यावें त्याच प्रमाणें दुसऱ्यांकडून घेतांना त्यानें फार सख्त

होऊं नये. ह्मणजे व्यापारधंद्यामध्यें व आपल्या सर्व व्यवहारांमध्यें त्यानें आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्यांशीं नेकीनें व प्रेमळ अंतःकरणानें वागावें; आपला हक्क असला तरी तो कधीं कधीं त्यानें दुसऱ्यासाठीं सोडावा; आपला थोडासा तोटा झाला तरी तो सोसावा; परंतु तंट्यास जाऊं नये पण यावरून आपल्या धनदौलतीविषयीं निष्काळजी राहावें असें नाहीं. आपल्या मिळकतीची उस्तवारी न ठेवणें व ती जीर्ण होऊं देणें हें लांच्छनास्पद आहे. याकरतां तिची काळजी वाहिली पाहिजे. पण ती अशा रीतीनें वाहावी कीं, कृपणपणाचा किंवा धनलोभाचा दोष आपल्या अंगीं येऊं नये. आपली मिळकत सुरक्षित राहून आपल्याला परोपकार करण्याचें सामर्थ्य असावें यालाच संपत्तीचा खरा व मुख्य उपभोग ह्मणावें. परकी लोकांचेंही आदरातिथ्य करावें. तेणें करून स्वराज्याला भूषण येतें व परराज्यामध्यें आपली कीर्ति होते.

परोपकार द्रव्यसाह्यानेंच होतो असें नाहीं; एकाद्याला आपण श्रमाच्या रूपानें साह्य केलें तर तोही परोपकार होतो. गरजवंतास सल्ला मसलत देणें, बुद्धिवाद सांगणें, कायद्याचें ज्ञान करून देणें, इत्यादि प्रकारांनींहीं उपकार करतां येतो. व या सर्व प्रकारांनीं मदत करण्यास आपण समर्थ असलों तर होईल तेवढ्यांना अवश्य मदत करावी; मात्र इतकेंच लक्षांत ठेवावें कीं, एकाला मदत करायाला गेलें तर दुसऱ्याची हानि होऊं नये. नकळत दुसऱ्याची हानि झाली तर त्याची क्षमा मागावी. व आपण केलें तें नकळून केलें व तें करणें कसें जरूरीचें होतें हें त्याला

समजावून सांगावें, व कधीं कधीं त्याची हानि झाली असेल ती भरून द्यावी.

ज्या मनुष्यावर उपकार करायाचे त्याची अब्रू पाहून किंवा त्याचें भाग्य पाहून बहुधा त्याची पात्रता ठरवितात. आतां साधारणपणें लोक असें ह्मणतात कीं– " उपकार करते वेळीं आह्मी मनुष्याच्या भाग्याकडे मुळींच लक्ष देत नाहीं. त्याची अब्रू पाहूनच त्याजवर करायाचा तो उपकार करतों. " असें खरोखरच असेल तर फारच चांगलें आहे. परंतु श्रीमान व सत्ताधीश पुरुषावर उपकार करण्याचा प्रसंग आला असतां तो टाकून एकाद्या गरीब पण अब्रूदार मनुष्यावर उपकार करील असा कोण आहे? जगांत साधारण रीत पाहिली तर ज्याच्याकडून त्वरित व अनायासें फळप्राप्ति होण्यासारखी असते त्याच्याकडे मोहाचा ओघ जास्त असतो. परंतु वास्तविक प्रकार कसा असावा तें पाहूं. कोणीसें ह्मटलें आहे कीं– " ज्यानें कर्ज घेतलें आहे तो ऋणमुक्त नव्हे, व ज्यानें कर्ज फेडलें आहे तो ऋणी नव्हे. जो उकपत आहे त्यानें उपकार फेडले तरी त्याला त्यांचें स्मरण असतें, व ज्याला उपकाराचें स्मरण असतें त्यानें उपकार फेडल्यासारखेंचआहे. " हें ह्मणणें अगदीं खरें आहे. जर गरीब मनुष्यावर उपकार केले तर कदाचित ते त्याच्या हातून फिटणार नाहींत हें खरें, पण तो भला मनुष्य असला तर ते कधींही विसरणार नाहीं. पण जे श्रीमान व भाग्यवंत असतात त्यांना, आपण दुसऱ्याचे उपकारी आहों असें कबूल करणें आवडत नसतें. इतकेंच नव्हे तर त्यांच्यावर केवढा जरी उपकार केला तरी त्यांना

वाटतें कीं, उपकार करून घेतल्यानें आपणच दुसऱ्यांवर अनुग्रह करीत आहों. व त्यांच्यावर उपकार करूं गेलें तर उपकार करूं इच्छिणाराला आपल्यापासून कशाची तरी अपेक्षा आहे असा त्यांना संशय येतो. पण एखाद्या गरीबावर उपकार केले तर तो मनांत ह्मणतो कीं, उपकार करणारानें माझ्या संपत्तीकडे कांहीं पाहिलेलें नाहीं; त्याचे उपकार माझ्यावरच आहेत. असें समजून तो आपली कृतज्ञता दाखविण्याला सदां उत्सुक असतो. व ज्यानें उपकार केला असतो त्यापाशींच नव्हे तर इतर लोकांपाशींही तो बोलत सुटतो. ( कारण त्याला पुष्कळ लोकांचें साह्य पाहिजे असतें. ) आणि कदाचित त्यानें कांहीं उलट उपकार केला तर त्याबद्दल फुशारकी न मिरवितां आपण केलें तें कांहींच नाहीं असें तो ह्मणतो. याकरतां भाग्यशाली मनुष्यावर उपकार करण्यापेक्षां भल्या गरीब मनुष्यावर उपकार करावा हें चांगलें. सर्व प्रतींच्या लोकांना खुषी करावें हें फारच उत्तम. पण जर श्रीमंत व भले यांमध्यें निवड करायाची असली तर थेमिस्टोक्लिसानें दिलेलें उत्तर लक्षांत ठेवावें. थेमिस्टोक्लिसाला एकदां कोणी विचारलें कीं, एखाद्यानें आपली मुलगी गुणवान गरिबाला द्यावी किंवा गुणहीन श्रीमंताला द्यावी ? त्यावर थेमिस्टोक्लिसानें उत्तर केलें " गुणहीन द्रव्याशीं लग्न लावून द्यावें त्यापेक्षां द्रव्यहीन गुणांशीं लग्न लावावें हें बरें असें मला वाटतें. " परंतु हल्लीं आमची स्थिति अशी झाली आहे कीं, दुसऱ्याची संपत्ति पाहून आह्मी आपले डुलत राहतों. दुसऱ्याची संपत्ति कितीही मोठी असली तरी आह्मांला काय ? त्याला कदाचित तिचा उपयोग होत

संस्थानचा अधिकारी होऊन गेला, त्याची गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. आरेटसच्या बापाचा पराजय होऊन त्याचें राज्य शत्रूच्या हस्तगत झाल्यानंतर आरेटसला देशत्याग करावा लागला. परंतु त्यानें संधी राखून सुमारें पन्नास वर्षांनीं आपलें राज्य पुन्हा मिळविलें. तो परत आला त्या वेळीं शत्रूनें हांकून लावलेले त्याच्या राज्यांतील सहाशें श्रीमान लोक त्याच्या बराबर होते. जिकडे तिकडे स्वस्थता झाल्यावर त्या लोकांच्या मिळकती ज्या माजी राजांनीं काढून घेऊन दुसऱ्यांना दिल्या होत्या, त्या त्यांना परत कशा मिळाव्या हा त्याला मोठा विचार पडला. ज्यांच्यापाशीं त्या होत्या त्यांच्याकडून त्या काढून घ्याव्या तर तें बरोबर नाहीं. कारण वहुतेकांना त्या अन्यायावांचून मिळाल्या होत्या; ह्मणजे कोणाला वारसाच्या हक्कानें, कोणाला फरोक्तखतावरून, कोणाला लग्नांत आंदण मिळाल्या होत्या, व त्या त्यांच्यापाशीं पन्नास वर्षें चालत आलेल्या होत्या. त्यांच्याकडून काढाव्या तर अन्याय केल्यासारखा होतो, न काढाव्या तर त्यांच्या मूळ मालकांना उपाशीं मरण्याची पाळी येते. तेव्हां करावें काय असा आरेटसाला मोठा विचार पडला. शेवटीं त्याची खातरी झाली कीं, आपल्यापाशीं पुष्कळसें द्रव्य असल्यावांचून या बिकट कामाचा निकाल लावतां येणार नाहीं. ह्मणून आपण परत येईपर्यंत तें तसेंच ठेवण्यास सांगून तो आलेक्सांड्रिया शहरास गेला. तेथें त्याचा मित्र टालेमी हा राज्य करीत होता. त्याला ही सर्व हकीगत सांगून त्याजपासून त्यानें एक टोलेजंग रक्कम कर्ज घेतली, व परत आपल्या राज्यांत आला. नंतर वजनदार

अशा पंधरा लोकांची एक सभा करवून त्यानें सर्व मिळकतींच्या किमती ठरविल्या, त्या ज्यांच्या कबजांत होत्या त्यांना बोलावून आणिलें, व तुह्मी जमिनीची किंमत घेऊन जमिनी सोडून देण्यास राजी आहां कीं काय, असें विचारलें. जे जमिनी सोडण्यास राजी झाले त्यांना किंमत देऊन त्यांच्या जमिनी मूळ मालकांस दिल्या. जे राजी झाले नाहींत त्यांजपाशीं जमिनी तशाच ठेवून त्यांच्या ऐवजीं मूळ मालकांस पैसे दिले. याप्रमाणें कोणाची कुरकुर न राहतां या बिकट कामाचा निकाल झाला.

आतां ज्या गोष्टी उपयुक्त आहेत त्यांची कधीं कधीं एकमेकांशीं तुलना करावी लागते. त्या वेळीं हे पुढील नियम लक्षांत ठेवावे.— द्रव्यसंचयापेक्षां शरीर संपत्ति चांगली. बळापेक्षां संपत्ति चांगली. विषयसुखापेक्षां आरोग्य चांगलें. संपत्तिपेक्षां कीर्ति चांगली. इत्यादि. पैसा मिळविण्याच्या कामीं—ह्मणजे तो जमवावा कसा, व्याजीं लावावा कसा, खर्चावा कसा—या कामीं या प्रकारचा विचार करावा लागतो. पण या विषयाचा विचार तत्त्वज्ञान्यांनीं करावा त्यापेक्षां मारवाड्यांनीं व सराफांनीं करावा हें बरें. यासाठीं आपण बाकी राहिलेल्या विषयांकडे वळूं.